जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. लोकमत शुक्रवार, दिनांक 4 MAR 2016

# पाच हजारजणांनी घेतली कौशल्ये

## शिवाजी विद्यापीठ : कौशल्य विकास मेळाव्याचा समारोप

कोल्हापूर : रोजगार, नोकरीसाठी उपयुक्त ठरणारी मुलाखतीचे तंत्र, ऑनलाइन ॲडव्हर्टायझिंग, एनर्जी टेक्नॉलॉजी अशी विविध कौशल्ये सुमारे पाच हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जाणून घेतली. यासाठी त्यांनी शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित कौशल्य विकास मेळाव्याची संधी साधली. या मेळाव्याचा गुरुवारी समारोप झाला.

राज्य शासनाचा रोजगार व स्वयंरोजगार विभाग, विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र आणि युवक कल्याण कक्षातर्फे विद्यापीठातील लोककला केंद्रात हा कौशल्य मेळावा घेण्यात आला. यातून बुधवारी (दि. २) आणि गुरुवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील सुमारे पाच हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध कौशल्ये आत्मसात केली. मेळाव्याचा समारोप विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या माजी प्रमुख डॉ. वासंती रासम यांच्या उपस्थितीत झाला. त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याचा कुलगुरूंचा मानस आहे. त्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी डॉ. एस. एस. कोळेकर, सहायक संचालक सचिन जाधव उपस्थित होते. समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. दरम्यान, या मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींकडून त्यांना हव्या असणाऱ्या कौशल्यांबाबतची माहिती संकलित केली आहे. तिचे विश्लेषण करून पुढील उपक्रमासाठी संबंधित माहिती विद्यापीठाला सादर करणार असल्याचे मेळाव्याचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी सांगितले. (प्रतिनिधी)

### सातत्य ठेवावे



कौशल्य विकास ही सध्याची मागणी आणि काळाची गरज आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने आयोजित केलेल्या कौशल्य मेळाव्याचा उपक्रम यापुढील काळात सातत्याने आयोजित करण्यात यावा, अशी अपेक्षा मेळाव्यातील सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व्यक्त केली.

दै. सकाळ शुक्रवार, दिनांक 4 MAR 2016

# पाच हजारांवर विद्यार्थ्यांनी कौशल्ये केली आत्मसात

## शिवाजी विद्यापीठात कौशल्य मेळाव्याचा समारोप



कोल्हापूर, ता. ३ : यापुढेही शिवाजी विद्यापीठातर्फे कौशल्य मेळावा घेण्यात यावा, अशी अपेक्षा विद्यार्थी व कौशल्य प्रदात्यांनी आज येथे व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आयोजित पहिल्या दोनदिवसीय विद्यापीठीय कौशल्य मेळाव्याचा आज समारोप झाला. त्या वेळी विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. दोन दिवसांत पाच हजारांहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध कौशल्ये आत्मसात केली.

शासनाचा रोजगार व स्वयंरोजगार विभाग, विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, युवक कल्याण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मेळावा झाला. तीसहून अधिक कौशल्य प्रदात्यांचे येथे स्टॉल्स होते. त्यातून ८५ पेक्षा अधिक विविध कौशल्ये प्रदान करण्याचे नियोजन होते. व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखतीचे तंत्र यापासून ते अगदी माहिती तंत्रज्ञान, मनुष्यबळ व्यवस्थापन, ऑनलाइन ॲडव्हर्टायझिंग, एनर्जी टेक्नॉलॉजीपर्यंत अनेक कौशल्यांचा समावेश होता. समारोपप्रसंगी प्रा. डॉ. वासंती रासम यांनी विद्यार्थ्यांचे स्किल मॅपिंग करून त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याचा कुलगुरूंचा मानस असल्याचे स्पष्ट केले. या वेळी डॉ. एस. एस. कोळेकर, सहायक संचालक सचिन जाधव उपस्थित होते. समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. यशवंत शितोळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


दै. लोकसत्ता शुक्रवार, दिनांक -4 MAR 2016

# सी.एन.आर. राव यांना कणबरकर पुरस्कार

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवाजी विद्यापीठातर्फे** देण्यात येणारा पहिला राष्ट्रीय 'प्राचार्य आर.के. कणबरकर पुरस्कार' भारतरत्न प्रा. सी.एन.आर. राव यांना जाहीर करण्यात आला आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी ही माहिती दिली. दीड हजारांहून अधिक शोधनिबंध व पन्नासच्या आसपास पुस्तके नावावर असलेले ते देशातील एकमेव संशोधक आहेत. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा.कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठास २५ लाख रुपयांच्या ठेवीतून हा पुरस्कार देण्यात येत आहे. कणबरकर यांच्या पत्नी श्रीमती शालिनी कणबरकर



यांनी सदर ठेवीसाठीचा धनादेश सुपूर्द केला होता.

निधीतून प्राचार्य आर.के. कणबरकर स्मृती पुरस्काराची निर्मिती करण्यात आली. अत्युत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी हा पुरस्कार देण्याचे ठरविले आहे, असेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.

रसायनशास्त्रातील 'विज्ञानयोगी' असे वर्णन करण्यात येत असलेल्या प्रा. चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांनी वाराणसीतील बनारस हिंदू विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. संशोधनासाठी ते अमेरिकेस रवाना झाले. पर्ड्यू विद्यापीठातून मध्ये त्यांनी पीएच.डी. संपादन केली. त्यानंतर आयआयटी (कानपूर)च्या रसायनशास्त्र विभागाचे प्रमुखपद स्वीकारले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत त्यांनी सॉलिड स्टेट अँड स्ट्रक्चरल केमिस्ट्री विषयातील संशोधन प्रयोगशाळेची स्थापना केली. सी.एन.आर. राव हे 'सॉलिड स्टेट' आणि 'मटेरिअल्स केमिस्ट्री'मधील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ आणि या क्षेत्रातील एक अधिकारी संशोधक म्हणून ओळखले जातात. सी. व्ही. रामन आणि माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यानंतर भारतरत्न पुरस्कार प्राप्त करणारे ते देशातले तिसरे शास्त्रज्ञ आहेत. पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

दै. महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शुक्रवार, दिनांक 4 MAR 2016

## सी. एन. आर. राव यांना कणबरकर पुरस्कार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



सी. एन. आर. राव

भारतरत्न पुरस्काराने सन्मानित प्रा. सी. एन. आर. राव हे शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. त्यांना विद्यापीठातर्फे यावर्षीपासून दिला जाणारा प्रतिष्ठेचा पहिला प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

रोख १ लाख २५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. कणबरकरांच्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला १२ एप्रिलला सायंकाळी ५ वाजता विद्यापीठात पुरस्काराचे वितरण केले जाईल. माजी कुलगुरूंच्या नावे पुरस्कार सुरु करणारे शिवाजी विद्यापीठ पहिले विद्यापीठ ठरले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ही माहिती दिली. ➤➤ सविस्तर वृत्त...३

## डॉ. राव यांचा १२ एप्रिलला करवीरनगरीत गौरव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पहिला 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना जाहीर करण्यात आला. येत्या १२ एप्रिल रोजी विद्यापीठात सायंकाळी पाच वाजता या पुरस्काराचे वितरण होईल. रोख १ लाख ५५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ही माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबियांनी विद्यापीठाला २५ लाख रुपयांची ठेव दिली होती. त्यांच्या पत्नी शालिनी कणबरकर यांनी हा धनादेश दिला होता. या निधीतून प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कारची निर्मिती करण्यात आली. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, संशोधनासह अन्य क्षेत्रात अत्युकृष्ट कामगिरी बजाविणाऱ्याला व्यक्तिला पुरस्कार देण्याचा निर्णय पाच सदस्यीय विशेष शोध समितीने घेतला. कणबरकरांच्या स्मृतिदिनी हा पुरस्कार देण्याचा निर्णय समितीने घेतला. या पुरस्कारासाठी पहिल्या टप्प्यात सहा जणांची निवड केली होती. पैकी समितीने राव यांच्या कार्याची दखल घेऊन अंतिम निवड केली. कणबरकरांच्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.' यावेळी समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

राव यांना रसायनशास्त्रातील 'विज्ञानयोगी' मानले जाते. त्यांचे मूळ कुटुंबिय कोल्हापूरचे आहे. त्यांचे आजोबा कोल्हापुरातील आहेत. त्यांचे कुटुंबिय सुमारे ११० वर्षापूर्वी बंगळूरु येथे स्थायिक झाले. राव यांनी म्हैसूर विद्यापीठातून डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी मिळविली आहे.

दै. पुण्य नगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शुक्रवार, दिनांक - 4 MAR 2016

# आर. के. कणबरकर पुरस्कार सी.एन.आर. राव यांना जाहीर



**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा पहिला राष्ट्रीय प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार भारतरत्न प्रा. डॉ. सी.एन.आर. राव यांना जाहीर करण्यात आला. १२ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता तो प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिंदे यांनी सांगितले की, १ लाख ५१ हजार रु. रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे ▶▶ पान ४ वर

# आर. के. कणबरकर पुरस्कार सी.एन.आर. राव यांना जाहीर

(पान १ वरून) स्वरूप आहे. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य आर. के. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठास २५ लाखांची ठेव दिली होती. कणबरकर यांच्या पत्नी शालिनी कणबरकर यांनी सदर ठेवीसाठी धनादेश विद्यापीठाकडे सुपूर्द केला होता. त्यातून प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्काराची घोषणा करण्यात आली. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाशी केलेल्या सामंजस्य कराराला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

ते म्हणाले, देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रांत अत्युत्कृष्ट कामगिरी बजाविणाऱ्या व्यक्तीला कणबरकर यांच्या स्मृतिदिनी दरवर्षी पुरस्कार देण्याचे ठरविले. यंदा विज्ञानयोगी रसायनशास्त्रज्ञ भारतरत्न प्रा. डॉ. सी. एन. आर. राव यांचे नाव निश्चित करण्यात आले. रसायनशास्त्रातील विज्ञानयोगी असे वर्णन करण्यात येत असलेल्या प्रा. चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांचा जन्म १९३४ मध्ये बंगळूर येथे झाला. विद्यार्थिदशेपासूनच रसायनशास्त्राची आवड असल्याने त्यांनी १९५१ मध्ये म्हैसूर विद्यापीठातून याच विषयातून बी. एस्सी. शिक्षण पूर्ण केले. वाराणसीतील बनारस हिंदू विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. संशोधनासाठी ते अमेरिकेस रवाना झाले. पर्ड्यू विद्यापीठातून १९५८ मध्ये त्यांनी पीएच.डी. संपादन केली. भारतात परतल्यानंतर १९६१ मध्ये म्हैसूर विद्यापीठातून डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी मिळवली. त्यांनी आयआयटी कानपूरच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रमुखपद स्वीकारले.

देश व परदेशात विद्यार्थी घडविण्याचे काम केल्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत त्यांनी सॉलिड स्टेट अँण्ड स्ट्रक्चरल केमिस्ट्री विषयातील संशोधन प्रयोगशाळेची स्थापना केली. १९८४ ते १९९४ पर्यंत या संस्थेचे संचालकपद भूषविले. दीड हजाराहून अधिक शोधनिबंध व पन्नासच्या आसपास पुस्तके नावावर असलेले ते एकमेव संशोधक आहेत. राव हे 'सॉलिड स्टेट' आणि 'मटेरियअल्स केमिस्ट्री' मधील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ आणि या क्षेत्रातील एक अधिकारी संशोधक म्हणून ओळखले जातात.

सी. व्ही. रामन आणि माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यानंतर भारतरत्न पुरस्कार प्राप्त करणारे ते देशातील तिसरे शास्त्रज्ञ आहेत. ६९ विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट देऊन गौरविले आहे. पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. राव यांचा साहित्य, संगीत, राजकारण व समाजव्यवस्था या विषयाचाही सखोल अभ्यास आहे.

### प्राचार्य कणबरकर यांनी विद्यापीठ क्षेत्रात केलेले काम

ललितकला विभाग संख्याशास्त्र विभाग, प्रौढ व निरंतर शिक्षण विभागाची त्यांनी नव्याने सुरुवात केली. सोलापूर येथे विद्यापीठाच्या उपकेंद्राचा प्रारंभ करण्यात आला. शाहू संशोधन केंद्राचे पुनरुज्जीवन, उच्च शिक्षण पदोत्तर अभ्यासक्रम, एमपीएड अँड एम.फिल.ची सुरुवात, विद्यापीठ सेवा सल्ला केंद्राची स्थापना, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी परीक्षा पद्धतीत बदल, निरंतर अंतर्गत मूल्यमापन पद्धतीचा प्रारंभ.

विद्यापीठ प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव – पुणे व मराठवाडा विद्यापीठ अँकॅडेमिक कौन्सिल व सिनेटचे सभासद, शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणीचे दहा वर्षे सभासद, कला शाखाप्रमुख, विद्यापीठाच्या अनेक समित्यांवर सभासद म्हणून उल्लेखनीय कार्य, नवीन शैक्षणिक व्यवस्थेत विद्यापीठ पातळीवर इग्रजीचा अभ्यास तयार केला. १९७४ चा विद्यापीठाचा नवीन कायदा तयार करण्यात महत्त्वाचा सहभाग.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. पुढारी शुक्रवार, दिनांक – 4 MAR 2016

# डॉ. राव यांना 'रा. कृ. कणबरकर' पुरस्कार

## कुलगुरू डॉ. शिंदे यांची माहिती; १२ एप्रिलला वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा पहिला राष्ट्रीय 'प्राचार्य आर.के. कणबरकर' पुरस्कार भारतरत्न प्रा. डॉ. सी.एन. आर. राव यांना जाहीर करण्यात आला आहे. १२ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता विद्यापीठात होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी (दि. ३) केली.

१ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कारार्थीच्या निवडीसाठी कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय विशेष शोध समिती स्थापन करण्यात आली. कुलसचिव समितीचे



डॉ. वी. एन. पवार पदसिद्ध सदस्य सचिव आहेत. ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत सदस्य आहेत. शोध समितीने प्राचार्य आर.के. कणबरकर पुरस्कारासाठी एकमताने प्रा. सी.एन. आर. राव यांची निवड केली, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, डॉ. बाबासाहेब खोत आदी उपस्थित होते.

**'कोल्हापूरशी नाते असणारे विज्ञानयोगी रसायनशास्त्रज्ञ'**

रसायनशास्त्रातील 'विज्ञानयोगी' असे वर्णन असलेल्या प्रा. चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांचा जन्म ३० जून १९३४ रोजी बंगळूर येथे झाला. त्यांच्या पूर्वजांचे कोल्हापूरशी नाते आहे.

ते देशमुख नावाने परिचित होते. विद्यार्थी दशेपासून रसायनशास्त्राची आवड असल्याने त्यांनी १९५१मध्ये त्यांनी म्हैसूर विद्यापीठातून बी. एस्सी.चे शिक्षण पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षणानंतर ते संशोधनासाठी ते अमेरिकेस रवाना झाले. पर्ड्यू विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली.

दै. लोकमत शुक्रवार, दिनांक – 4 MAR 2016

# 'रा. कृ. कणबरकर' पुरस्कार सी. एन. आर. राव यांना जाहीर

**कोल्हापूर :** रसायनशास्त्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ भारतरत्न प्रा. डॉ. सी. एन. आर. राव (चिंतामणी नागेश रामचंद्र)



यांना शिवाजी विद्यापीठातर्फे 'प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार' देऊन सन्मानित केले जाणार आहे. विद्यापीठाचा हा पहिलाच राष्ट्रीय पुरस्कार आहे. रोख १ लाख ५१ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. त्याचे वितरण दि. १२ एप्रिलला सायंकाळी पाच वाजता लोककला केंद्रात होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या पत्नी शालिनी यांनी कुटुंबीयांच्या वतीने विद्यापीठाला २५ लाख रुपयांच्या ठेवीसाठी धनादेश प्रदान केला. या निधीतून संबंधित पुरस्काराची निर्मिती केली आहे. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व अन्य क्षेत्रांत अत्युत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला प्राचार्य कणबरकर यांच्या स्मृतिदिनी दरवर्षी हा पुरस्कार देण्याचे ठरविले. या पुरस्कारासाठी पुरस्कारार्थीच्या निवडीसाठी विद्यापीठाने पाचसदस्यीय विशेष शोध समिती स्थापन केली. या समितीत कुलगुरू, कुलसचिव, ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांचा समावेश आहे. पत्रकार परिषदेस प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, समितीचे सदस्य डॉ. बाबासाहेब खोत उपस्थित होते. (प्रतिनिधी)

### पन्नास पुस्तके... दीड हजार शोधनिबंध

प्रा. राव यांचा जन्म बंगलोर येथे झाला. उच्च शिक्षणानंतर त्यांनी आयआयटी (कानपूर)च्या रसायनशास्त्र विभागाचे प्रमुखपद स्वीकारले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये त्यांनी सॉलिड स्टेट अँड स्ट्रक्चरल केमिस्ट्रीच्या संशोधन प्रयोगशाळेची स्थापना केली. सुमारे दीड हजार शोधनिबंध आणि ५० पुस्तके नावावर असणारे ते देशातील एकमेव आहेत. 'भारतरत्न' पुरस्कार प्राप्त करणारे ते देशातील तिसरे शास्त्रज्ञ आहेत. दरम्यान, प्रा. राव यांचे पूर्वज कोल्हापूरचे आहेत. त्यांचे येथील आडनाव देशमुख असल्याचे संदर्भ काही पुस्तकांतून मिळत असल्याचे डॉ. खोत यांनी सांगितले. ते म्हणाले, त्यांचे पूर्वज हे बंगलोरला स्थलांतरित झाल्यानंतर त्यांचे आडनाव राव झाले. करवीरनिवासिनी अंबाबाई त्यांची कुलदेवता आहे.

दै. सकाळ शुक्रवार ; दिनांक 4 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यंदा १६ हजार ८८३ पदवी प्रमाणपत्रांचे वाटप

कोल्हापूर, ता. ३ : यंदा शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यात १६ हजार ८८३ पदवी प्रमाणपत्रांचे वाटप झाले. ९९ बूथद्वारे प्रमाणपत्रांचे वाटप करत परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांच्या लागणाऱ्या रांगांना 'ब्रेक' लावण्याचे काम केले.

विद्यापीठाचा परीक्षा विभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. गेल्या दोन वर्षांत तो विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रुटी, निकालास झालेला विलंब यामुळेच चर्चेत राहिला. या विभागाला



अनेकांनी टीकेचे लक्ष्यही केले. मात्र, याच विभागाने अभियांत्रिकी विभागाचा निकाल नियोजित वेळेपूर्वी जाहीर करत आपली कर्तव्यतत्परता सिद्ध केली असताना, त्याकडे कानाडोळा करण्यात आला. यंदाच्या सोहळ्यात पदवी प्रमाणपत्रात काही त्रुटी नक्की राहणार, असाच अनेकांचा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र तसे काही घडले नाही. ज्या थोड्याफार त्रुटी राहिल्या, त्याला जबाबदार विद्यार्थीच असल्याचे सांगितले जाते. परीक्षा विभागाने मात्र टीकेकडे दुर्लक्ष करत पदवी प्रमाणपत्रे वाटपाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.

यंदा सोहळ्यात एकूण २४ हजार ३६० प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार होते. त्यासाठी विविध विभागांतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. नव्याण्णव बूथवर सकाळपासूनच कर्मचारी कार्यरत होते. विद्यार्थ्यांनी केवळ त्यांचा नंबर सांगितल्यावर त्यांना प्रमाणपत्र देण्यात येत होते. त्याचाच परिणाम म्हणून एकाच दिवसात १६ हजार ८८३ प्रमाणपत्रांचे वाटप झाले. उर्वरित ७ हजार ४७७ प्रमाणपत्रेही देण्याचे काम सुरू आहे.

---

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. सकाळ शुक्रवार ; दिनांक 4 MAR 2016

# डॉ. सी. एन. आर. राव यांना पहिला 'कणबरकर' पुरस्कार

## कुलगुरू डॉ. शिंदे यांची घोषणा : १२ एप्रिलला वितरण



सी. एन. आर. राव

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा पहिला राष्ट्रीय प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना देण्यात येणार आहे, अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. एक लाख ५१ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून येत्या १२ एप्रिलला पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, "प्राचार्य कणबरकर हे विद्यापीठाचे माजी कुलगुरू होते. त्यांच्या स्मृतीनिमित्त राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठास २५ लाख रुपयांचा धनादेश ठेवीसाठी दिला होता. कणबरकर यांच्या पत्नी शालिनी कणबरकर

पान ९ वर »

# डॉ. सी. एन. आर. राव यांना पहिला 'कणबरकर' पुरस्कार

» पान १ वरून

यांनी हा धनादेश दिला होता. 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कारा'ची निर्मिती या निधीतून केली आहे. त्यासाठी विद्यापीठाशी केलेल्या सामंजस्य कराराला व्यवस्थापन परिषदेनेही मान्यता दिली आहे. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व अन्य क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला प्राचार्य कणबरकर यांच्या स्मृतिदिनी पुरस्कार देण्याचे ठरविले आहे."

ते म्हणाले, "पुरस्कारप्राप्त व्यक्तीच्या निवडीसाठी पाच सदस्यांची विशेष शोध समिती स्थापन केली आहे. विद्यापीठाचे कुलसचिव समितीचे पदसिद्ध सचिव आहेत. ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत सदस्य आहेत. या समितीने डॉ. राव यांची या पुरस्कारासाठी निवड केली. 'रसायनशास्त्रातील विज्ञानयोगी' असे त्यांचे वर्णन केले जाते. त्यांनी म्हैसूर विद्यापीठातून बीएस्सी ची पदवी मिळविली, तर वाराणसीतील बनारस हिंदू विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. दीड हजारांहून अधिक शोधनिबंध व सुमारे पन्नास पुस्तके नावावर असलेले ते एकमेव संशोधक आहेत. ते 'सॉलिड स्टेट' व 'मटेरियल्स केमिस्ट्री'मधील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. जगभरातील सुमारे ६० विद्यापीठांनी त्यांना मानद डाक्टरेटने सन्मानित केले आहे. सी. व्ही. रामन, माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यानंतर भारतरत्न पुरस्कार मिळविणारे ते देशातील तिसरे शास्त्रज्ञ आहेत. पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे."

पत्रकार परिषदेला प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत, डॉ. एस. एस. कोळेकर उपस्थित होते.

**सी. एन. आर. राव मूळचे महाराष्ट्रीय**

डॉ. राव यांचे आजोबा मूळचे महाराष्ट्रीय असून त्यांचे मूळ आडनाव देशमुख असे आहे. शिवाजी महाराजांच्या राजवटीत जी माणसे दक्षिण भारतात वतनदार म्हणून स्थायिक झाली, त्यातील कोलार येथे स्थायिक झालेले देशमुख कुटुंब. त्यांचे आजोबा मूळ देशमुख असेच अडनाव लावत. त्यानंतर मग वडिलांनी स्थानिक पद्धतीनुसार अद्याक्षरांचे नाव लिहिणे सुरू केले. त्यामुळे सी. एन. आर. यांचे नाव चिंतामणी नागेश्वर रामचंद्र राव (देशमुख) असे आहे.

दै. तरुण भारत शुक्रवार, दिनांक -4 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शास्त्रज्ञ डॉ. राव यांना राष्ट्रीय 'कणबरकर पुरस्कार' जाहीर

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : १२ एप्रिल रोजी लोककला केंद्रामध्ये होणार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा पहिला राष्ट्रीय 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' भारतातील डॉ. सी. एन. आर. राव यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार विद्यापीठातील लोककला केंद्रामध्ये १२ एप्रिल रोजी प्रदान करण्यात येणार आहे. १ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली.

[illegible]





डॉ. सी. एन. राव    रा. कृ. कणबरकर

[illegible]

---

दै. तरुण भारत शुक्रवार, दिनांक -4 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थिनींना मिळणार आत्मसंरक्षणाचे धडे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. बाबासाहेब यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त विद्यापीठातील क्षेत्रातील महाविद्यालयातील एनएसएसच्या १२५ विद्यार्थिनींना ज्युदो व कराटेचे शिक्षण देऊन आत्मसंरक्षणाचे धडे देण्यात येणार आहेत. युवतींमधील न्यूनगंड कमी करून त्यांना निर्भय करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत महिला सबलीकरणाची मूठ विद्यापीठातर्फे बांधली जात आहे.

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार सर्वांना समान हक्क दिले आहेत. सध्याच्या काळात मात्र महिलांच्या संरक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत होणाऱ्या अत्याचारामुळे महिलावर्गाला जीव मुठीत घेऊन जगण्याची वेळ आली आहे. दिल्लीतील निर्भया प्रकरण, मुंबईतील महिला छायाचित्रकारावर झालेला सामूहिक बलात्कार, मुकलेच शिवसेना शाखाप्रमुखाने ठाण्यामध्ये महिला वाहतूक पोलिसाला केलेली मारहाण, अशा अनेक घटना वारंवार घडत आहेत. एखादी घटना घडली की सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, किंवा एनजीओ काही दिवस मोर्चे आंदोलने करतात. काही दिवसांनी या गोष्टींवर पडदा पडून अशा घटना फक्त राजकीय मुद्दा बनतात. विद्यापीठाने मात्र शिक्षण घेत असताना मुलींना



स्वसंरक्षण करता यावे म्हणून प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो युवतींना दिलासा देणारा आहे. संबंधित मुलीने अन्यायाचा प्रतिकार कसा करावा याचे प्रशिक्षण या अभियानांतर्गत दिले जाणार आहे. प्रशिक्षणातून युवतींमध्ये स्वसंरक्षणासाठी आत्मविश्वास जागृत करण्याचे काम विद्यापीठाअंतर्गत केले जाणार आहे.

शिक्षणाबरोबर युवतींना आत्मसन्मानाने जगता यावे, धाडसी वृत्तीने अन्यायाविरोधात किंवा संकटाशी परिस्थितीशी दोन हात करण्याची ताकद त्यांच्यात निर्माण व्हावी, असा विद्यापीठाचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १२५ विद्यार्थिनी यामध्ये सहभागी झाल्या आहेत. यामुळे युवतींच्या सबलीकरणाची मूठ बांधली तरच समाजातील वाईट प्रवृत्तींना आळा बसणार आहे. कारण जी गोष्ट एका व्यक्तीकडून होत नाही ती गोष्ट सामूहिक प्रयत्नातून होऊ शकते. यासाठी महाविद्यालयीन युवतींना ७ दिवस निवासी स्वसंरक्षण शिबिरामध्ये प्राणायाम, ज्युदो, कराटे, लाठी-काठीचे प्रशिक्षण देऊन आगळ्या वेगळ्या उपक्रमातून युवतींना स्वयंसिद्ध बनवण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. महिलांबाबत संविधानामधील कायदेविषयक तरतुदी, लैंगिक छळ प्रतिबंधक कायदेविषयक माहिती, लेक वाचवा तसेच महिला सबलीकरण याविषयी विविध तज्ञ मार्गदर्शन करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्याचा विद्यापीठाचा हा अगळा वेगळा उपक्रम बहुचर्चित होणार आहे. विद्यापीठ वर्तुळात या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

**मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानानुसार कायद्याची इत्थंभूत माहिती विद्यार्थिनींना देण्यासाठी आणि युवतींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ही संकल्पना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारली आहे.
- डॉ. डी. के. गायकवाड

---

दै. तरुण भारत शुक्रवार, दिनांक -4 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आगामी काळ कृषी, अन्न प्रक्रिया उद्योगांचा

## डॉ. पी. जी. अडसुळे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात 'पेस्ट मॅनेजमेंट'वर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

[illegible]



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कृषी, रसायने व कीड व्यवस्थापन अधिविभागामार्फत [illegible] हस्ते विशेष स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. पी. जी. अडसुळे, सोबत डॉ. डी. एन. शिंदे, डॉ. डी. जे. नाईक, डॉ. एस. बी. देशमुख, डॉ. पी. बी. अनभुले.

[illegible]

The Times of India, Friday 4 MAR 2016

# Over 5,000 students flock to first SUK fair

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The first skill fair organized by Shivaji University concluded on Thursday with an overwhelming response from students across southern Maharashtra.

Organisers were expecting up to 2,000 footfalls in the two-day fair, but more than 5,000 students turned up for the fair.

As many as 32 stalls were set up at the Lok Kala Vikas Kendra at the university. The campus wore a crowded look throughout the two-day fair with students busy understanding the new skills.

Students were trained in 85 different skills during the fair.

The university's skill and entrepreneurship development centre arranged the event during which experts and companies from software development to agriculture participated.

Each stall had a couple of instructors imparting information to the students.

> Theoretically, I am perfect. But I sensed that I lack practical skills. I attended the fair and want to explore more about advanced web designing
>
> **Priyanka Gore** | STUDENT OF VIVEKANADA COLLEGE STUDYING MASTER OF COMPUTER APPLICATIONS

"We know it is impossible to prepare any student within a two-hour skill training programme, however, we are amazed at their response. Students came from interiors parts of Sangli, Satara and Kolhapur districts. More than 50% of them were women. As many as 70 girls from Atpadi taluka in Sangli came especially for the fair," said A M Gurav, convener of the fair.

"At our stall, 90 students registered since Thursday morning. An equal number of students were waiting for training. We provided a two-hour long session on web development and HTML," said Kuldeep Waydande, assistant professor at Ashokrao Mane Group of Institutes.

Students were found to be more interested in soft skills and information technology-related skills.

Gauri Jadhav, who have completed her graduation studies in computers, came to the fair to learn web designing. "Theoretically, I am perfect. But I sensed that I lack practical skills. I attended the fair and want to explore more about advanced web designing," she said.

Priyanka Gore, a student of Vivekanand College, who is pursuing postgraduate studies in computer applications, was looking for soft skills such as interviewing techniques and others.

"We have registered the names of each student, their contact details and the skills they are looking for. The companies, instructors and experts voluntarily came together from Pune, Kolhapur, Sangli, Satara and other places. We observed that a majority of the students were interested in soft skills such as personality development, body language, employability and others," said Gurav.



Students were trained in 85 different skills during the fair

Even after the formal concluding ceremony, students were found engaged in discussions with skill instructors till late in the evening.